महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग

**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अहिल्यानगर यांचे कार्यालय**

पत्ता : इंपेरिअल चौक, स्टेशन रोड, अ. नगर. पिन क्रमांक : ४१४ ००१, दूरध्वनी क्रमांक : (०२४१) २४७१३२२
email-ddcahnagar@gmail.com

"पशुपक्ष्यांच्या आजारावर घरपोच उपचार. एका कॉलच्या अंतरावर. संपर्क टोल फ्री क्रमांक १९६२"

जा.क्र. जिपसंउआ /द्रवनत्र पात्रे/निर्लेखन/१३३०/२०२५ अहिल्यानगर दि. ९ /५/२०२५

# जाहिर लिलाव

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र अहिल्यानगर या कार्यालयातील निर्लेखन झालेल्या निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा लिलाव दि. २१.५.२०२५ रोजी सकाळी ११.३० वा.**

**निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करणा-या इच्छुक व्यक्ती /संस्था/ कंपन्या / खरेदीदार यांना सुचित करणेत येते की जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,** अहिल्यानगर **या कार्यालयातील निरुपयोगी निर्लेखित केलेल्या विविध आकाराच्या द्रवनत्र पात्रांची जाहिर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे. सदर द्रवनत्र पात्रे इच्छुकांना आहेत त्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलाव करावयाच्या द्रवनत्र पात्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | लिलावाचा दिनांक व वेळ | द्रवनत्र पात्रांचा तपशिल | संख्या |
|---|---|---|---|
| १ | २१ मे २०२५ सकाळी ११.३० वा. | टी.ए. -५५ द्रवनत्र पात्रे | ७७ |
| ३ | | आय.एन.-५० द्रवनत्र पात्रे | ३३ |
| ४ | | आय. आर.-३ द्रवनत्र पात्रे | ७६ |
| ५ | | बी.ए.-०३ द्रवनत्र पात्रे | १२० |
| ६ | | टी.ए.-६० द्रवनत्र पात्रे | ७९ |
| | | एकुण | ३८५ |

**उपरोक्त नमुद निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा दि. २१ मे २०२५ रोजी सकाळी ११.३० वा.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, इंपेरिअल चौक, स्टेशन रोड,** अहिल्यानगर **येथे जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या व्यक्ती /संस्था/ कंपन्या / खरेदीदार यांना निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करावयाची असतील अशा व्यक्ती /संस्था/ कंपन्या / खरेदीदार यांनी लिलाव प्रक्रियेत भाग घेणेसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या नावे ( Demand Draft of Rs. 10000/- in favour of District Deputy Commissioner, Animal Husbandry Payable at Ahilyanagar ) रु. १००००/- (अक्षरी दहा हजार मात्र) चा धनाकर्ष** किंवा रोख रक्कम स्वीकारली जाईल. **जाहिर लिलावासाठी गठित जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम राहील. लिलावानंतर विक्री करावयाची सर्व द्रवनत्र पात्रे ही चेपल्यानंतरच हस्तांतरीत करण्यात येतील जेणेकरुन त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.**

१. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अहिल्यानगर पशुसंवर्धन विभागाकडील द्रवनत्रपात्राची लिलावाव्दारे विक्री करावयाची असून विक्री करावयाचा साहित्याचा सविस्तर तपशिल वरीलप्रमाणे आहे.

२. लिलाव करतांना परिस्थितीनुसार निर्धारित वेळेत बदल करण्यात येईल.

३. लिलावाची बोली बोलण्यापुर्वी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अहिल्यानगर यांच्या नावाने रक्कम रु. 10000/- **(अक्षरी दहा हजार मात्र)** चा राष्ट्रीयकृत बँकेत काढलेला डी.डी. किंवा रोख रक्कम रु. 10000/- अनामत म्हणून प्रथम दि. 21.5.2025 रोजी सकाळी 11.00 वाजे पर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, **इंपेरिअल चौक, स्टेशन रोड,** अहिल्यानगर येथे जमा करावी लागेल. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

४. लिलाव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, **इंपेरिअल चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर** येथे कार्यालयीन वेळेत 11.30 वाजताचे दरम्यान करण्यात येईल. परंतू कोणत्याही परिस्थितीत व्यत्यय आल्यास किंवा स्थिती जैसे थे ठेवण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

**५. ज्या किमतीस लिलाव अंतीम झाला, त्यावेळेस अंतीम बोलीधारकाने एकूण किंमतीच्या 10 टक्के रक्कम कार्यालयास त्यावेळेस जमा करावी लागेल व उर्वरित रक्कम दि. 23 मे 2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अहिल्यानगर यांच्या शासकीय बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.**

६. लिलावात बोली घेणे तसेच द्रवनत्रपात्राची निर्धारित किंमत प्राप्त झाल्यावरही मंजुरी देणे किंवा न देणे या बाबतचे शासन निर्णयानुसार अधिकारांचा वापर परिस्थितीनुसार करण्यात येईल.

७. लिलाव धारकाने मोक्यावर उपलब्ध द्रवनत्रपात्राची पाहणी करुनच लिलावात बोली बोलावी.

८. अनामत रक्कम भरतेवेळी प्रतिनिधी पाठवल्यास लिलाव धारकाने पॉवर ऑफ ऍटर्नी आणि स्वतः असल्यास वास्तव्याबाबत पुरावा म्हणून आधारकार्ड/ रेशनकार्ड/घर टॅक्स पावती/आयकर पॅन/विक्री प्रमाणपत्र/विदयुत बिल/ टेलीफोन बिल/निवडणूक ओळखपत्र यापैकी एक दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे. तसेच खरेदीदारांनी त्यांचा टैंन नंबर / पॅन नंबरची प्रत सादर करावी.

9/5/25

(डॉ. सुनिल तुंबारे)
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**
**अहिल्यानगर**

# लिलावाचे शर्ती व अटी

१) अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावात बोली बोलता येणार नाही. अनामत रक्कम रू. 10,000/- लिलावाचे वेळी अनामत रक्कम डी.डी. किंवा रोख स्वरूपात भरावी लागेल. बोली बोलणाऱ्याकडून जमा करण्यात आलेली अनामत रक्कम लिलाव घेणाऱ्या व्यक्ती व्यतीरिक्त इतर सर्वांना त्याच दिवशी परत करण्यात येईल.

२) एखाद्या व्यक्तीस दुसऱ्याच्या वतीने अथवा कंपनीतर्फे बोली बोलायची असेल तर बोली बोलणाऱ्या व्यक्तीने ठराविक नमुन्यात अधिकारपत्र (पॉवर ऑफ ऍटर्नी) दाखल करावी लागेल, तरच बोली बोलता येईल. भागीदारी असेल तर भागीदारी पत्राची साक्षांकित प्रत दाखल करावी लागेल, तरच त्यांना बोली बोलता येईल.

३) लिलाव खरेदीदाराने विक्री किंमतीचा भरणा राष्ट्रीयकृत बँकेचा डी. डी. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अहिल्यानगर यांचे नावाने स्विकृत होईल अशा त-हेने काढावा.

४) सर्व बोलीधारकांना पॅनकार्डाची छायांकित प्रत सत्यप्रत (self attested) देणे आवश्यक आहे. पॅनकार्ड नसेल तर २० टक्के आयकर लावण्यात येईल. अन्यथा लिलाव रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

५) लिलावात अंतर्भुत द्रवनत्र पात्रांची पाहणी मोक्यावर अगोदरच करून स्वतःची खात्री करून घ्यावी.

६) लिलावाची बोली सुरु असतांना तिसऱ्या किंवा अंतीम बोलीवर कोणत्याही कारणास्तव लिलाव रदद् करण्याचा अधिकार कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

७) लिलाव मंजूर झाल्यानंतर सदर द्रवनत्र पात्रे राखण्याची जबाबदारी लिलाव घेणाऱ्याची राहील.

८) नैसर्गिक आपत्ती वा इतर कारणामुळे लिलाव झालेल्या द्रवनत्रपात्रांचे नुकसान झाल्यास विकत घेणारे जबाबदार राहतील व हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

९) लिलावात अंतर्भुत द्रवनत्र पात्राची मोजणी/नोंदी नुसार असून यामध्ये कमी जास्त फरक असू शकतो. बोलीदाराने प्रत्यक्ष पहाणी करुन बोली बोलावी. द्रवनत्रपात्राच्या तफावतीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. पाहणी करुन कार्यालयाशी संपर्क साधावा,

१०) द्रवनत्र पात्रांचा लिलाव पुर्ण झाल्यानंतर मालाची उचल/ने आण इ. संपूर्ण बाबी विहित नियमानुसार करणेची जबाबदारी बोलीधारकाची राहील.

११) सदर द्रवनत्रपात्रे विक्रीकरिता योग्य प्रतीसाद न मिळाल्यास किंवा अपेक्षेप्रमाणे किंमत प्राप्त न झाल्यास लिलाव रदद् करणे, दरपत्रक मंजूर किंवा नामंजुर करणे किंवा पुढे ढकलणे याबाबचे संपुर्ण अधिकार जिल्हास्तरीय निरुपयोगी द्रवनत्र पात्राचा जाहीर लिलाव समितीकडे राहतील. याबाबत कोणत्याही दर पत्रक धारकांची तक्रार / हुज्जत ऐकून घेतली जाणार नाही.

१२ ) वादग्रस्त प्रकरणांवर जिल्हास्तर निरुपयोगी द्रवनत्र पात्राचा जाहिर लिलाव समितीचा निर्णय अंतीम समजण्यांत येईल व त्यावर कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

१४) परिस्थितीनुसार एखादी अट शिथिल करणे रदद करणे किंवा नव्याने काही अटी लावणे या याबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हास्तरीय निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा जाहिर लिलाव समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

१५) **यशस्वी बोलीधारकाने लिलाव मंजूर झाल्यानंतर रु. 1000 /- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यातील करारनामा करून एकूण किंमतीच्या 10 टक्के रक्कम कार्यालयास त्यावेळेस जमा करावी लागेल व उर्वरित रक्कम दि. 23 मे 2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अहिल्यानगर यांच्या शासकीय बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.** सर्व निर्लेखन मालाची उचल/ने-आण इ. संपूर्ण बाबी पुर्ण कराव्या लागतील.

9/5/25

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**अहिल्यानगर**